आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता
२९ मार्च २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशात एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरवठा सामान्य, व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठाही ७० टक्क्यापर्यंत पोहोचल्याचं पेट्रोलियम मंत्रालयाचं स्पष्टीकरण

- पश्चिम आशियातल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना एकजुटीनं सामोरं जाण्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बातमधून आवाहन

- चार राज्यं, आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या विधानसभा निवडणुकांसाठी प्रचाराला वेग, पश्चिम बंगालसाठी काँग्रेसची उमेदवार यादी जाहीर

- उयद्योगपती विजयपत सिंघानिया यांच्या पार्थिवावर मुंबईत अंत्यसंस्कार

**आणि**

- आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सची जोरदार फटकेबाजी

**<><><><>**

देशात एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत असून रोज ५५ लाख सिलिंडरचं वितरण केलं जातं आहे, तसंच व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठाही सामान्य परिस्थितीत होता त्याच्या ७० टक्क्यापर्यंत पोहोचल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं सांगितलं.

देशभरातल्या सर्व पेट्रोल पम्पांवर पेट्रोल आणि डिझेलचाही पुरेसा साठा उपलब्ध असल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर या भागातले सर्व भारतीय खलाशी सुरक्षित असल्याचं बंदरे आणि जहाजबांधणी मंत्रालयानं म्हटलं आहे. १८ भारतीय जहाजं आखाती देशात सध्या कार्यरत असून ९०० खलाशी आतापर्यंत मायदेशी परतले आहेत. त्याचप्रमाणे ९४ हजार मेट्रिक टनाचा माल वाहून नेणारी दोन एलपीजी वाहक जहाजं भारताच्या दिशेनं निघाल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

**<><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धस्थितीमुळे निर्माण झालेल्या आव्हानांना एकजुटीनं सामोरं जाण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मन की बात मधून केलं. आकाशवाणीवरच्या या कार्यक्रमाचा आज १३२ वा भाग होता. भारत, गेल्या दशकात निर्माण केलेलं सामर्थ्य आणि जागतिक संबंधांच्या जोरावर या आव्हानाचा खंबीरपणे सामना करत असल्याचं त्यांनी सांगितलं. ….

**- - होल्ड बाईट - YUDDHA PETROL SANKAT - - -**

जनतेनं अफवांना बळी पडू नये आणि सरकारकडून मिळणाऱ्या अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असं त्यांनी सांगितलं. हा विषय १४० कोटी भारतीयांच्या हिताचा असल्यानं त्यात राजकारण करू नये असं ते म्हणाले. अफवा पसरवणारे लोक देशाचं नुकसान करत आहेत असं मोदी म्हणाले.

युवाशक्तीला अर्थसंकल्पाची प्रक्रिया आणि धोरणनिर्मितीशी जोडण्यासाठी 'माय भारत' संघटनेच्या वतीनं अर्थसंकल्पावर आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषेत देशभरातल्या १२ लाख युवा प्रतिनिधींनी सहभाग घेतल्याची माहिती त्यांनी दिली.

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतला भारताचा विजय तसंच जम्मू काश्मीरनं प्रथमच रणजी चषक जिंकल्याचा उल्लेख करुन प्रधानमंत्र्यांनी क्रीडा क्षेत्रातल्या प्रगतीचा आढावा घेतला. शिक्षण क्षेत्रातल्या अभिनव प्रयत्नांची माहितीही त्यांनी आजच्या भागात दिली.

आंतरराष्ट्रीय योग दिनाला शंभर पेक्षा कमी दिवस उरले असल्याचं सांगून, त्यांनी श्रोत्यांना आरोग्यवर्धनाबाबत माहिती दिली.

मच्छिमार बांधव हे समुद्रावरचे योद्धे आणि आत्मनिर्भर भारताचा सशक्त पाया असून, त्यांच्या जीवनसुलभतेसाठी अनेक उपक्रम राबवले जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

**- - होल्ड बाईट - MACHHIMAAR - - -**

मत्सोद्योग क्षेत्रातल्या देशभरातल्या विविध नवोन्मेषी उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर देशभरात जलसंरक्षणासाठी होत असलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करून, जलसंवर्धनाचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं.

**- - होल्ड बाईट - UNHALA - - -**

अमृत सरोवर अभियानाअंतर्गत देशभरात सुमारे ७० हजार अमृत सरोवरांची निर्मिती केली असून, पावसाळ्याआधीच त्यांच्या स्वच्छतेचं काम सुरु झाल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली.

**<><><><><>**

मंगोलियाच्या सत्ताधारी पक्षानं उचरल न्याम ओसोर यांची नवे प्रधानमंत्री म्हणून निवड केली आहे. नऊ महिने प्रधानमंत्री राहिलेल्या जंदनशतार गोम्बोझाव यांनी राजीनामा दिल्यानंतर सत्ताधारी मंगोलियन पीपल्स पार्टीनं पक्षाच्या बैठकीत हा निर्णय घेतला.

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं स्थलांतर आणि परराष्ट्र धोरण, तसंच इराण युद्धातल्या सहभागा विरोधात काल अमेरिकेत आणि युरोपमध्ये **‘नो किंग्स’** या बॅनरखाली हजारो नागरिकांनी एकत्र येऊन निदर्शनं केली. सेंट पॉल इथल्या मिनेसोटा स्टेट कॅपिटलमध्ये झालेल्या मुख्य रॅलीत २ लाखापेक्षा जास्त नागरिक सहभागी झाले होते. निदर्शकांनी शहरांमधल्या मुख्य रस्त्यांवर रांगा लावल्या, तसंच सार्वजनिक चौकांमध्ये फलक घेऊन घोषणा दिल्या.

**<><><><><>**

चार राज्यं, आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या विधानसभा निवडणुकांसाठी प्रचारानं जोर धरला आहे. ज्येष्ठ भाजपा नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केरळममधे पलक्कड प्रचारसभा घेतली. पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धपरिस्थितीत सरकारनं भारतीयांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. संवेदनशील विषयांच्या बाबतीत विधानं करून काँग्रेस राजकारण करते असा आरोप त्यांनी केला. डावी आघाडी आणि काँग्रेस आघाडी दोन्ही भ्रष्ट असून भाजपाच केरळचा विकास करू शकते असं ते म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी त्रिशूर इथं प्रचारयात्रा काढली.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यातल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपा सरकार वर तीव्र ताशेरे ओढले. त्या आज पुरुलिया इथं एका जाहीर सभेत बोलत होत्या. भाजपा इतर राज्यांमध्ये बंगाली भाषिकांवर हल्ले करत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

ज्येष्ठ भाजपा नेते अमित शाह यांनीआज आसाममध्ये ढेकियाजुली मतदारसंघात प्रचार सभा घेतली. आसाममधला बेकायदेशीर स्थलांतरितांचा ओघ रोखण्यात भाजपाला यश मिळालं असून, येत्या ५ वर्षांत, त्यांना परत पाठवण्याची प्रक्रिया केली जाईल, असं ते यावेळी म्हणाले.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं २८४ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. त्यात बहारामपूरमधून माजी खासदार अधीर रंजन चौधरी, भवानीपूरमधून प्रदीप प्रसाद, मालतीपूरमधून माजी खासदार मौसम नूर, यांना उमेदवारी दिली आहे. या निवडणुकीत 'इंडियन गोरखा जनशक्ती फ्रंट' हा पक्ष ५ जागांवर निवडणूक लढवणार आहे. अध्यक्ष अजय एडवर्ड यांनी आज आपल्या पक्षाच्या उमेदवारांची नावं घोषित केली. ते स्वतः दार्जिलिंग मधून निवडणूक लढवतील.

तामिळनाडूमधल्या विधानसभा निवडणुकांमध्ये अभिनेता-राजकारणी विजय यांनी स्थापन केलेला 'तमिळगा वेंट्री कळगम' हा पक्ष पहिल्यांदाच निवडणूक लढवत आहे. विजय यांनी आज आपल्या पक्षाच्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. विजयस्वतः पेरंबूर आणि त्रिची पूर्व या दोन जागांवर निवडणूक लढवत आहेत.

**<><><><><>**

प्रसिद्ध उद्योगपती आणि रेमंड उद्योगसमूहाचे माजी प्रमुख विजयपत सिंघानिया यांच्या पार्थिवावर आज मुंबईत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं काल मुंबईत निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. रेमंड या कपड्यांच्या जगप्रसिद्ध ब्रँड बरोबरच पोलाद, सिमेंट, आणि कृत्रिम वस्त्रांच्या उद्योगात सिंघानिया यांनी वेगळं स्थान निर्माण केलं होतं.

कारखानदारीबरोबरच वैमानिक म्हणूनही त्यांनी नाव कमावलं होतं.   हवाई दलानं त्यांना मानद एअर कमोडोर पद दिलं होतं, तर केंद्र सरकारनं  पद्मभूषण सन्मान प्रदान केला होता. २००६ मधे ते मुंबईचे नगरपाल होते. अहमदाबादच्या भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या संचालक मंडळावरही त्यांनी काम केलं होतं.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीत आज मुंबईत वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना सुरु आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. आयपीएल टी ट्वेंटी

क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सची जोरदार फटकेबाजी केली आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा कोलकाता नाईट रायडर्सच्या १४ षटकात ३ बाद १५० धावा झाल्या होत्या.

<><><><><>

मंगोलियात उलानबातार इथं आयोजित आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय मुष्टीयोद्ध्यांचे सामने उद्यापासून सुरु होतील. महिला गटात लव्हलिना बोर्गोहिन, निखत जरीन, मिनाक्षी हुडा आणि जॅस्मिन लॅम्बोरिया, तर, पुरुष गटात जादुमणी सिंग, सचिन सिवाच आणि नरिंदर बेरवाल यांच्या खेळाकडे सर्वांच लक्ष असेल.

या स्पर्धेत अंतिम फेरीत पोहोचणाऱ्या खेळाडूंना राष्ट्रकुल आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत थेट प्रवेश मिळणार असल्यानं ही स्पर्धा महत्वाची असणार आहे.

//<><><><><>//